FYBMM(M) Eff. Comm. Skills (L)

26/9/14 N010AGL

गुण : ७५ वेळ – २ तास ३० मि.

सूचना :- सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

विभाग १

.......................................................................................................................

प्र. १. संज्ञापनावर आधारित पुढील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (१५)

सदाशिव अय्यर हे जळगावात जैन इरिगेशन या कंपनीत नव्यानेच व्यवस्थापक म्हणून रुजु झाले. अय्यर हे गेली १० वर्षे तामिळनाडूतील जैन इरिगेशनच्या शाखेत कामाला होते. बढती मिळाल्यामुळे त्यांना जळगावाला यावे लागले. तामिळ भाषिक अय्यर यांनी एकदा घाईघाईत आपल्या सचिवाला ते अचानक चैन्नईला जात असल्याचे आपल्या मातृभाषेत सांगितले व ते एका आठवड्यासाठी चैन्नईला निघून गेले. इकडे दुसऱ्या दिवशी त्यांच्या सचिवांनी त्याची परदेशी गुंतवणूकदारांसोबत महत्वाची बैठक आयोजित केली होती. परदेशी गुंतवणुकीदार विमानाने प्रवास करुन जळगावला जैन इरिगेशनच्या कारखान्यात आले व इकडे अय्यर साहेब कार्यालयात न आल्यामुळे कंपनीच्या महाव्यवस्थापकांनी त्यांना फोन केला. तेव्हा श्री अय्यर यांनी आपण आपल्या सचिवांना चैन्नईला जाण्याबाबत कळविले असल्याचे सांगितले. जैन इरिगेशनच्या महाव्यवस्थापकांनी अय्यर साहेबांच्या सचिवाला ' कारणे दाखवा' नोटीस बजावली व अय्यर साहेबांच्या सचिवांची प्रतिमा व प्रतिष्ठा त्यामुळे डागाळली.

याच कंपनीतील कामगारांच्या सततच्या काम बंद आंदोलनावर मार्ग काढण्यासाठी श्री. एकनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. समितीला या प्रश्नावर उपाय सुचविण्यासाठी सांगण्यात आले. एकनाथ पाटील यानी समितीतील सदस्यांची बैठक घेऊन त्यांना सांगितले की, इतर सदस्यांनी या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काहीही करायची गरज नाही. ते स्वबळावरच या समस्येवर मार्ग शोधतील सुमारे सहा महिन्यांनी एकनाथ पाटील यांनी आपला अहवाल कंपनीला सादर केला. मात्र त्यांच्या अहवालातील एकाही सूचनेला स्वीकारण्यात आले नाही व कंपनीला कामगारांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.

प्रश्न.

१) वरील उताऱ्यातील संज्ञापनातील विविध प्रकारचे अडथळे लिहा. (५)

२) संज्ञापनातील अडथळ्यांमुळे उद्भवणाऱ्या परिणामांची चर्चा करा. (५)

३) संज्ञापनातील अडथळे दूर करण्यासाठी उपाय लिहा. (५)

प्र. २ . अ) 'भारतीय माध्यमातील स्त्रियांचे चित्रण' या विषयावर निबंध लेखन करा. (८)

ब) कोणत्याही वृत्तपत्रात प्रसिध्द होण्यासाठी तुम्ही राहात असलेल्या परिसरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येसंबंधी तक्रार करणारे पत्र संपादकांना लिहा. (०७)

किंवा

प्र. २ अ. 'दूरचित्रवाणीवरील वॉशिंग पावडरच्या जाहिरातीसाठी संहिता लेखन करा. (०८)

ब) लोकन्युज या प्रसिध्द वृत्तवाहिनीसाठी वार्ताहर या पदासाठी अर्ज व स्वपरिचय पत्र तयार करा. (०७)

प्र. ३ टिपा लिहा. (१५)

१) संज्ञापनातील मानसशास्त्रीय अडथळे.

२) सूत्रसंचालकांची गुणवैशिष्टे

३) सादरीकरण

किंवा

प्र. ३ टिपा लिहा. (१५)

१) आकलन

२) संज्ञापनातील भाषिक व सांस्कृतिक अडथळे.

३) रेडिओ जॉकी

विभाग - २

प्र. ४ पुढील उताऱ्याचे आकलन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे 'हिंदी किंवा इंग्रजी भाषेत लिहा. (१५)

भाषा म्हणजे एकमेकांशी संपर्क साधण्याचे प्रभावी साधन आहे. व भाषांतर म्हणजे दोन भाषांना एकत्र करणारा, त्यांच्यामध्ये वेगळे नाते निर्माण करणारा दुवा आहे. भाषांतर करणाऱ्या व्यक्तीला 'दुभाष्या' म्हणतात, कारण तो दोन भाषांची जबाबदारी पार पाडत असतो.

भारतासारख्या बहुभाषी देशात लोकसभेत आणि अनेक देशांचे प्रतिनिधी जिथे जमतात त्या संयुक्त राष्ट्रसंघात अशा दुभाष्यांची योजना केलेली असते. भाषांतराचा दुसरा प्रकार आहे लखी भाषांतर. हे विशेषत: साहित्यकृतीचे असते. तसेच ते निरनिराळी माहिती व सूचना देणारेही असते. साहित्यकृतीच्या भाषांतराची परंपरा खूप मोठी आहे. संस्कृत भाषेतील 'शाकुंतल' ह्या नाटकाचे जर्मन भाषेत भाषांतर झाले, हे खूप प्रसिध्द उदाहरण आहे. संस्कृत आणि प्राकृत अशा भाषांमध्ये प्राचीन काळापासून परस्पर भाषांतर चालत आले आहे. एकोणीसाव्या शतकात

NOIOAGL

आधुनिक भारतीय भाषांमधील भाषांतरांना मोठी चालना मिळाली. याच काळात वेदांचे इंग्रजी भाषेत भाषांतर झाले. 'गितांजली' या टागोरांच्या काव्यसंग्रहाला इंग्रजीत भाषांतर झाल्यामुळे नोंबेल पारितोषिक मिळाले. मराठी भाषेतही भाषांतराला चांगली चालना मिळा ली आहे. कालिदासांच्या 'मेघदूत' चे एकोणीस मराठी कवींनी भाषांतर केले आहे. विनोबांच्या भगवतगीतेचे 'गीताई' हे सुलभ मराठीत केलेले भाषांतर प्रसिध्द आहे. वि.स.खांडेकरांच्या 'ययाती' कादंबरीची अनेक भारतीय भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत. किंबहुना त्यांची अनेक भाषांतरे तामीळ आणि गुजराती भाषांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत.

भाषांतर हा साहित्याचा परिचय होण्यासाठी एकमेव आणि उत्तम मार्ग आहे. भाषांतराचे व्यावहारिक क्षेत्रही व्यापक आहे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमांना भाषांतराची सतत गरज असते. व्यापारी क्षेत्राचा डोलारा तर संपूर्णपणे जाहिरातींवर उभा असतो. या जाहिराती इंग्रजीतून किंवा हिंदीतून अन्य भारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या जातात. उद्योगक्षेत्रामध्ये तसेच शासन, न्याय या क्षेत्रातही भाषांतराची सतत गरज असते. शासकीय मजकुराचे मराठीत किंवा मराठी दस्तऐवजांचे इंग्रजीत भाषांतर असा हा दोन्ही दिशांनी कारभार चालतो. प्रशासकीय सोयीसाठी पदनामकोश, शासकीय मराठी कोश निर्माण झाले आहेत. भाषांतरासारखा ए 'स्वैर रूपांतर' नावाचा प्रकार आहे. मूळ साहित्यातील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ जेव्हा भाषांतरित भाषेपेक्षा भिन्न असतात तेव्हा स्वैर रूपांतराचा आधार घेतला जातो.

१) भाषांतराचे प्रकार स्पष्ट करा.

२) १९ व्या शतकातील भाषांतराबाबत उताऱ्यात काय म्हटले आहे ?

३) मराठी भाषेतील भाषांतराबाबत उताऱ्यात कोणते संदर्भ आलेले आहेत ?

४) स्वैर रुपांतर म्हणजे काय ? स्वैर रुपांतर केंव्हा केले जाते ?

५) भाषांतराच्या व्यावहारिक क्षेत्राबाबत उताऱ्यात काय म्हटले आहे ?

**प्र. ५. वरील उताऱ्याचे हिंदी किंवा इंग्रजी भाषेत भाषांतर करा. (१५)**

---